22-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/21/2025 10:23 PM Page 1



डिचोलीत मुसळधार; अनेक ठिकाणी पडझड » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



आयपीएल प्लेऑफचे वेळापत्रक जाहीर » पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, २२ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 259 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 22 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### देशात पुन्हा करोना; दोघांचा मृत्यू

**नवी दिल्ली, दि. २१ :** करोनाने पुन्हा एकदा जगात दहशत पसरवण्यास सुरुवात केली आहे. यामुळे आता भारताचंही टेन्शन वाढलं आहे. तर, हाँगकाँग आणि सिंगापूरमध्ये कोरोना व्हायरसच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. भारतातही काही रुग्ण समोर आले आहेत. केरळ, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये सध्या देशातील सर्वाधिक करोना रुग्ण आढळले आहेत, ज्यामुळे सरकारची चिंता वाढली आहे. करोनाच्या वाढत्या रुग्णांबाबत आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर एक आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांत दक्षिण भारतातील केरळ आणि तामिळनाडूमध्ये करोनाच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. केरळमध्ये आतापर्यंत ६९ सक्रिय करोना रुग्ण सापडली आहेत. तर, तामिळनाडूमध्ये ३४ सक्रिय रुग्ण आहेत. तर, महाराष्ट्रातही करोनाची ४४ सक्रिय प्रकरणं आहेत. महाराष्ट्रातही आरोग्य विभाग करोनाच्या वाढत्या रुग्णांवर लक्ष ठेवून आहे. याशिवाय कर्नाटक, गुजरात आणि दिल्लीमध्येही करोनाचे रुग्ण आढळून आल्याची माहिती आहे.

---

### पाकिस्तानात गृह युद्ध भडकणार ?

**इस्लामाबाद, दि. २१ :** पाकिस्तान सध्याच्या घडीला चारही बाजूंनी संकटात सापडला आहे. एकीकडे बलुचिस्तानात अस्थिरता निर्माण झालेली असताना दुसरीकडे सिंध प्रांत पेटला आहे. सिंधमधील जनता वादग्रस्त कालव्याच्या प्रकल्पाच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. आंदोलकांनी मंगळवारी सिंधचे गृह मंत्री जियाऊल हसन लंजर यांच्या घराला आग लावली. नौशेहरो फिरोज जिल्ह्यात गृहमंत्र्यांचं निवासस्थान आहे. आंदोलकांनी लंजर यांच्या मालमत्तेचं नुकसान केले. घरातील सामान पेटवून दिले.

आंदोलकांनी राष्ट्रीय महामार्गाच्या जवळ असलेल्या मोरो शहरातील मंत्र्यांच्या निवासस्थानला लक्ष्य केलं. त्या शेजारीच उभ्या असलेल्या दोन ट्रेलर्सलादेखील आग लावण्यात आली. यावेळी पोलीस आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली. यामध्ये दोन आंदोलकांचा मृत्यू झाला. या संघर्षात एक डीसीपी आणि सहा पोलीस कर्मचारी यांच्यासह १० पेक्षा अधिक नागरिक जखमी झाले. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

---

### अबुझहमाडमध्ये २७ नक्षलवाद्यांचे एन्काउंटर

**जगदलपूर, दि. २१ :** नारायणपूर जिल्ह्यातील अबुझहमाड जंगलात बुधवारी सकाळी सुरक्षा दलांनी २७ नक्षलवाद्यांना ठार मारले. २० जणांचे मृतदेह आणि शस्त्रे सापडली आहेत. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांमध्ये बसवा राजूचाही समावेश होता, ज्याच्या डोक्यावर दीड कोटी रुपयांचे बक्षीस होते. दंतेवाडा, नारायणपूर आणि विजापूर जिल्ह्यांच्या सीमेवर ही चकमक झाली.

नक्षलवादी संघटनेचा सरचिटणीस आणि नक्षलवादी पॉलिटब्युरो सदस्य बसवा राजू हा अबुझहमाडच्या बोटेरमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. बसवा राजूवर १.५ कोटी रुपयांचे बक्षीस आहे. दंतेवाडा, विजापूर, नारायणपूर आणि कोंडागाव येथून डीआरजी सैनिकांना बाहेर काढण्यात आले. सकाळी या भागात एक चकमक झाली.

पोलिसांनी ७ दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत करेगुट्टा ऑपरेशनची माहिती दिली होती. छत्तीसगड-तेलंगणा सीमेवरील करेगुट्टा टेकड्यांमध्ये २४ दिवस चाललेल्या कारवाईत सुरक्षा दलांनी ३१ नक्षलवाद्यांना ठार मारले होते. यामध्ये १६ महिला आणि १५ पुरुष नक्षलवादी आहेत.

# 'सैराट' पावसाचा कहर कायम : सावधान!

## झाडे कोसळली, पूरस्थिती, वाहतूक ठप्प | राजधानी पणजीतही वृक्ष कोसळले

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी/मडगाव, दि. २१ : राज्यात बुधवारीही मुसळधार पावसाचा जोर कायम राहिल्याने अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली असून वाहतूक व्यवस्थाही मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाली आहे. राज्यभरात पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे.**

राज्यातील अनेक भागात दरड कोसळणे, घरात पाणी शिरणे तसेच झाडे कोसळून दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान घडण्याच्या घटना घडल्या आहेत. पावसाची तीव्रता पाहता गोवा वेधशाळेने बुधवारी दुपारी १ वा. राज्यात रेड अलर्ट जारी केला असून नागरिकांनी योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शक्यतो पावसात घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पेडणे, मोरजी, सत्तरी, फोंडा, डिचोली मोठ्या प्रमाणात झाडांची पडझड झाली असून फोंडा, सोनारभाटात - रेईशमागूस येथे घरे जमीन दोस्त झाली आहेत

पणजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक आंब्याचे झाड कोसळल्याने परिसरात उभ्या असलेल्या सुमारे दहा दुचाकी वाहनांचे नुकसान झाले. सकाळी वास्कोमधील सडा उड्डाणपुलावर झालेल्या भूस्खलनामुळे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. या भागात सतत सुरू असलेल्या पावसामुळे ही घटना घडल्याचे सांगण्यात येते. पेडणे तालुक्यातील कासारवर्णे परिसरात एक मोठे वडाचे झाड कोसळून रस्त्याचा एक भाग बंद झाला. त्यामुळे जवळच असलेल्या राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक ठप्प झाली. या घटनेत एक चारचाकी वाहनही नुकसानग्रस्त झाले.

बार्देश तालुक्यातील खोर्ली येथे मुसळधार पावसाचे पाणी श्यामसुंदर कारेकर यांच्या घरात शिरले. हे घर एका मुलींच्या वसतिगृहासमोर असल्याने पाण्याचा निचरा न झाल्यामुळे संपूर्ण घर पाण्याखाली गेले. स्थानिकांनी यासाठी









अपुरी ड्रेनेज व्यवस्था आणि मान्सूनपूर्व गाळ न काढल्याची प्रशासनाची दुर्लक्ष करणं जबाबदार धरले आहे. या घटनेबाबत स्थानिक रहिवासी सिद्धार्थ कारेकर यांनी सांगितले की, मी १०७६, १०१ आणि १०८ या आपत्कालीन क्रमांकांवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. अखेर आम्हालाच आमच्या घरातून हाताने पाणी बाहेर काढावे लागले. एक ८० वर्षीय रहिवासी, नाव न सांगण्याच्या अटीवर म्हणाले, प्रशासनाकडून अनेक दावे केले जातात, वर्तमानपत्रांमधून प्रसिद्धही होतात. मात्र प्रत्यक्षात मदतीची गरज असते तेव्हा कोणीही येत नाही.

राजधानीच्या आदिल शाल पॅलेसमध्येही पाणी साचले. या ठिकाणी संग्रहालय विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने सांगितले, दरवर्षी हीच स्थिती असते. पावसाचे पाणी निघून जाण्यासाठी पुरेशी नाली व्यवस्था नाही, ही मुख्य अडचण आहे.

दरम्यान, वनमंत्री विश्वजित राणे यांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव दूधसागर धबधब्याचे प्रवेशद्वार पर्यटकांसाठी तात्पुरते बंद ठेवण्यात येत असल्याची माहिती दिली. सार्वजनिक सूचनापत्राद्वारे त्यांनी नागरिकांना आणि पर्यटकांना इतर धबधबे आणि ट्रेकिंग स्थळांवर जाण्याबाबत सावध राहण्याचे आवाहन केले. जोरदार प्रवाह, अचानक पूर आणि निसरडे भूभाग यामुळे जीवितहानीचा धोका असल्याचा इशाराही त्यांनी दिला.हवामान स्थिर होईपर्यंत कोणतीही ट्रेकिंग मोहीम किंवा धोकादायक भागात जाणे टाळावे, असे आवाहन त्यांनी केले. भारतीय हवामान विभागानुसार, राज्यात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर काही भागांत अत्यंत मुसळधार पावसाचा अंदाज असून, विशेषतः उत्तर गोव्यात ५०-७० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

# संततधार पावसाने दक्षिण गोव्याला धुतले!

## मडगाव शहराचे जनजीवन विस्कळीत | आपत्कालीन सेवांचा कस

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २१ :** बुधवारी झालेल्या संततधार पावसामुळे मडगाव व परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. शहरातील अनेक भाग जलमय झाले असून, सार्वजनिक पायाभूत सुविधांची कुचकामी स्थिती आणि आपत्कालीन तयारीतील त्रुटी पुन्हा समोर आल्या आहेत.

शहराच्या मध्यवर्ती भागातील मडगाव नगरपालिका परिषदेसमोरील रस्ता पूर्णतः पाण्याखाली गेला. आके परिसरातील पॉवर हाऊसजवळ एक गंभीर घटना घडली, जिथे मुसळधार पावसामुळे निवासी संकुलात अडकलेल्या मुलांना वाचवण्याची वेळ आली. सुदैवाने, कोणतीही जीवितहानी झाली नाही. मडगाव अग्निशमन दलाने तात्काळ हालचाली करत अनेक ठिकाणी मदतकार्य हाती घेतले. व्हिक्टर हॉस्पिटलजवळ कोसळलेले झाड त्वरित हटवण्यात आले, ज्यामुळे वाहतूक व आपत्कालीन सेवेचा मार्ग मोकळा झाला.

साओ जोस दे अरियलमधील नागरिकांनी स्थानिक पंचायतीवर





सांडपाण्याच्या नाल्यांची नियमित साफसफाई न केल्याचा आरोप करत निषेध व्यक्त केला. घरांमध्ये पाणी शिरल्याने अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले.

दरम्यान, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने मडगावमधील दामोदर गृहनिर्माण संकुलातील संरक्षक भिंत कोसळल्याची नोंद केली असून, तीन ठिकाणी सांडपाणी वहनाशी संबंधित घटनाही घडल्या आहेत. होस्पिसियो हॉस्पिटलजवळील घटना विशेषतः गंभीर मानली जात आहे.

फातोर्डा परिसरात, जुन्या बाजार सिग्नलजवळ गटारसाफसफाईच्या कामाची सुरुवात नारळ फोडण्याच्या औपचारिक विधीने करण्यात आली. मात्र, त्या कामातून काढलेला गाळ थेट रस्त्यालगतच टाकल्याने राय आणि फोंडा मार्गावरील प्रवासी व रहिवासी संतप्त झाले. पावसामुळे गाळ पुन्हा नाल्यांमध्ये गेल्याने परिश्रम वाया गेल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

स्थानिक आमदार वेंझी व्हिएगस यांनी प्रशासनाच्या सततच्या अकार्यक्षमतेवर तीव्र शब्दांत टीका केली. गोव्याचे भविष्य अधांतरी अवस्थेत आहे. कार्यक्षमतेचा मागमूसही नाही, असे ते म्हणाले. कोलवा , टिंटो परिसरातील मॅनहोलच्या रखडलेल्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सांडपाणी विभागाला जबाबदार धरावे, अशी मागणी त्यांनी केली.

फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी नागरिक आणि प्रशासन यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे सांगून, वीज उपकेंद्रामागील नाल्याच्या सुधारणा सुरू आहेत. मात्र, पावसाआधी नाल्यांची गाळसफाई पूर्ण करण्यात अपयश ही महापालिकेची गंभीर चूक आहे, असे स्पष्ट केले.

नावेली मधील डायलगोना परिसरात भूमिगत केबल टाकण्यासाठी खोदकाम चालू असताना पावसाचे पाणी साचल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली. ट्रान्सफॉर्मरजवळील संरचनेचा पाया सैल झाल्याने संरक्षक कुंपण कोसळले. या परिस्थितीमुळे स्थानिक रहिवासी आणि लोकप्रतिनिधींनी तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजनांची मागणी केली आहे. अपुरी ड्रेनेज व्यवस्था, रखडलेली गाळसफाई आणि यंत्रणांचा कमी प्रतिसाद या सगळ्यांमुळे दरवर्षी पावसाळ्यात शहराला सामोरे जावे लागणारे संकट पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# आमदार मोन्सेरात यांची महिलेला धक्काबुक्की !

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २१ :** ताळगाव येथील ओशेल परिसरात मंगळवारी रात्री राजकीय वातावरण चांगलेच तापले, जेव्हा स्थानिक आमदार जेनिफर मोन्सेरॉत आणि आम आदमी पक्षाच्या नेत्या सेसिल रॉड्रिग्ज यांच्यात वादाची ठिणगी उडून धक्काबुक्की झाली. ओशेल मधल्या घरांमध्ये वाहून आलेल्या प्रचंड चिखलाच्या घटनेच्या पार्श्वभुमीवर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ही घटना मंगळवारी रात्री सुमारे ८.५० वाजता घडली. आमदार जेनिफर, ताळगाव पंचायत सदस्य सिडनी बॅरेटो आणि त्यांच्या समर्थकांनी स्थानिक घाबरलेल्या नागरिकांशी संवाद साधत असताना सेसिल रॉड्रिग्ज घटनास्थळी पोहोचल्या, आणि त्यानंतर क्षणातच वादाला तोंड फुटले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, दोघींमध्ये शाब्दिक चकमक झाली. यावेळी जेनिफर यांनी सेसिल यांना ढकलल्याचा आरोप सेसिल यांनी

### ▶ जेनिफर यांच्याविरोधात सेसील रॉड्रिग्ज यांनी केली तक्रार दाखल

केला असून, त्या प्रकरणी त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सेसिल यांनी सांगितले की, एक युवक आमदार आणि प्रभावित नागरिकांमधील संवादाचे मोबाईलवर रेकॉर्डिंग करत होता. त्याला थांबवण्यासाठी बॅरेटो यांनी हस्तक्षेप केला आणि त्याचा फोन हिसकावण्याचा प्रयत्न केला. यानंतर अचानक जेनिफर यांनी मला पकडून ढकलले आणि माझ्याशी गैरवर्तन केले.

बुधवारी माध्यमांशी संवाद साधताना आमदार जेनिफर यांनी सेसिल यांना ढकलल्याची कबुली दिली आणि त्या कृतीचे समर्थन करत म्हणाल्या, होय, मी तिला ढकलले. ही तर सुरुवात आहे. ती त्याच लायकीची आहे. आम्ही संपूर्ण रात्र इथे होतो. सकाळी ८ वाजता पुन्हा आलो. पण सेसिलने काय केले? फक्त गोंधळ घातला आणि निघून गेली. आम्ही आमचे काम पूर्ण करणार.

तसेच, जेनिफर यांनी सांगितले की, प्रभावित तीन कुटुंबांना आम्ही एका हॉटेलमध्ये हलवले आहे. त्यांना गरज भासल्यास पुन्हा तातडीने व्यवस्था करण्यात येईल. दरम्यान, सेसिल रॉड्रिग्ज यांनी बुधवारी आमदार जेनिफर मोन्सेरेट, सिडनी बॅरेटो, बांधकाम व्यावसायिक सादिक शेख, मुधित गुप्ता यांच्यासह इतरांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. आपल्या तक्रारीत त्यांनी शारीरिक हल्ला, गुन्हेगारी धमकी, विनयभंग, आणि लोकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याचे आरोप केले आहेत.

तक्रारीत, सेसिल यांनी पोलिसांना त्वरित एफआयआर दाखल करणे, घटनास्थळी उपस्थित प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवणे, मोबाईल फुटेजसह ऑडिओ-व्हिडिओ पुरावे संकलित करणे, एका जखमी कार्यकर्त्याचा वैद्यकीय अहवाल गोळा करणे,सीसीटीव्ही फुटेज जप्त करणे आणि पुरावे नष्ट झाल्याची चौकशी करणे इत्यादी गोष्टींची मागणी केली आहे. पान २ ▶

# 'ऑपरेशन सिंदूर'मुळे दहशतवादाला शिक्षा : उपराष्ट्रपती

## आमची कारवाई दहशतवाद्यांना लक्ष्य करणारी | हरित पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उद्घटन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २१ :** भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर अलीकडील प्रत्युत्तरात्मक कारवाईत सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ने दहशतवादाला कठोर शिक्षा मिळणार असल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे, असे भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखर यांनी आज म्हटले. धनखर यांनी २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याला उत्तर देण्यासाठी सुरू केलेल्या या विशेष मोहिमेचा उल्लेख करताना सांगितले की, हा हल्ला शत्रूच्या प्रदेशात खोलवर होता, मात्र आमची कारवाई केवळ दहशतवाद्यांना लक्ष्य करणारी होती. त्यामुळे दहशतवादाला शिक्षा होणे अनिवार्य आहे, हे स्पष्टपणे दाखवले गेले. उपराष्ट्रपतींनी पुढे नमूद केले की देशाच्या आर्थिक विकासासाठी शांतता आणि स्थिरता अत्यंत आवश्यक आहे. युद्धासारख्या परिस्थितीत आर्थिक प्रगती अशक्य आहे. शांतता हा राष्ट्रीय विकासाचा पाया असून ती सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि राष्ट्रवादातून साकार होते, धनखर यांनी सांगितले.

धनखड यांनी ही प्रतिक्रिया बुधवारी मुरगाव बंदर येथे ३०० कोटी रुपयांच्या तीन महत्त्वाच्या हरित पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उद्घटनाच्या कार्यक्रमात व्यक्त केली. त्यांनी या टप्प्याला भारताच्या सागरी विकासाच्या इतिहासातील निर्णायक क्षण' असे संबोधले.

उद्घाटनात ३ मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प, मालवाहतुकीसाठी दोन बंदर मोबाइल क्रेन आणि पर्यावरणपूरक कोळसा हाताळणी घुमट यांचा समावेश आहे. उपराष्ट्रपतींनी केंद्र सरकारच्या जलद गतीने सुरू असलेल्या पायाभूत सुविधा विकास धोरणाचे कौतुक करत सांगितले की, नरेंद्र मोदी



सरकारच्या नेतृत्वाखाली जलदगतीने काम पूर्ण करणे ही मुख्य विशेषता आहे. पंतप्रधानांचे ध्येय विकासाला गती देणे हे आहे.

या उद्घाटनानंतर धनखर यांच्या तीन दिवसांच्या गोवा दौऱ्याची सुरुवात झाली, ज्यात ते राज्यातील अधिकारी, शास्त्रज्ञ आणि संरक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना भेटणार आहेत. भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांना संबोधित करताना उपराष्ट्रपतींनी सागरी आणि पर्यावरणीय सीमांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या जबाबदाऱ्यांचे कौतुक केले. तुम्ही प्रवाळ खडक, खारफुटी आणि सागरी जीवसृष्टीचे संरक्षण करता. तुम्ही देशाची पोलादभिंत, धोरणात्मक विचार आणि विवेकाचे बल आहात, असे ते म्हणाले. वास्को येथे उपराष्ट्रपतींचे स्वागत करताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी सांगितले की, ३ मेगावॅट क्षमतेचा नवीन सौरऊर्जा प्रकल्प मुरगाव बंदराला पूर्णपणे स्वच्छ ऊर्जेवर चालविणार असून त्यामुळे वार्षिक कार्बन उत्सर्जन ३,८०० टनांनी कमी होईल. मेरीटाइम इंडिया व्हिजन २०३० अंतर्गत एमपीटी भारतातील पहिले हरित बंदर होण्याच्या मार्गावर आहे, त्यांनी नमूद केले.

सावंत यांनी नव्याने सुरू झालेल्या कोळसा हाताळणी घुमटावरही प्रकाश टाकला, ज्यामुळे धूळ नियंत्रण आणि अग्निसुरक्षेत लक्षणीय सुधारणा होणार आहे. हा प्रकल्प प्रदूषण कमी करण्याचा आमचा ठोस प्रयत्न आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री सावंत यांनी केंद्राच्या आधुनिकीकरण धोरणाला पाठिंबा देत, स्थानिक कामगारांचे संरक्षण करण्याचे महत्त्वही अधोरेखित केले. विकास आवश्यक आहे, पण कामगारांचे हित सुरक्षित ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे, कारण अनेक कुटुंबे या बंदरावर अवलंबून आहेत, असे ते म्हणाले.

उपराष्ट्रपती धनखड गुरुवारी गोवा दौऱ्याचा पुढील टप्पा सुरू करतील. ते राजभवन येथे प्राचीन भारतीय वैद्यकीय दिग्गज आचार्य चरक आणि ऋषी सुश्रुत यांच्या पुतळ्यांचे अनावरण करतील आणि आयसीएआर सेंट्रल कोस्टल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट (सीसीएआरआय) येथे शास्त्रज्ञ व संशोधकांशी संवाद साधणार आहेत.